IIP
International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# भारतीय स्वातंत्र्य संग्रामात कापसे गणपती रामचंद्र आणि कापसे रुक्मिणी गणपती यांचे योगदान

**जाधव वैष्णवी नानासाहेब**

संशोधक विद्यार्थी, एम. ए. द्वितीय वर्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*भारतीय स्वातंत्र्य*

**ABSTRACT**

ब्रिटीशांच्या जुलुमाने त्रस्त झालेल्या जनतेला महात्मा गांधी यांच्या रुपाने मोठा आधार मिळाला होता. भारतातील जनता महात्मा गांधी यांच्या एका आदेशाने आंदोलनात सहभागी होत होती. साल 1930 रोजी गांधीजीने सविनय कायदेभंग चळवळ सुरु केली होती. साताऱ्यातील येडे मच्छींद्रगड या गावाचे नाना पाटील ब्रिटीश सरकाराच्या काळात तलाठी म्हणून नोकरी करीत होते. त्यांना समाजकार्याची आवड होती. देश गांधीजींच्या नेतृत्वाने भारावलेला होता. त्यांनी तलाठी पदाचा राजीनामा दिला आणि स्वतंत्र लढ्यात सहभागी झाले. त्यांच्यावर सत्यशोधक समाज, महात्मा ज्योतिबा फुले आणि राजर्षी शाहु महाराज यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी महात्मा गांधी यांच्या आदेशानुसार सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला त्यानंतर ब्रिटीश राजवट झुगारुन त्यांनी नीरा नदीकाठापासून, वारणा नद्यांच्या खोऱ्यात 9 ऑगस्ट 1942 रोजी क्रांतीसिंह नाना पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत प्रति सरकार म्हणजेच पत्री सरकार स्थापन केले. 'पत्री सरकार' जुलुम करणाऱ्यांच्या पायात पत्रे ठोकते अशीही अफवा त्याकाळी पसरली होती. काय होते पत्री सरकार आणि त्यांनी ब्रिटीशांचे जगणे कसे हराम केले. अडीचशेहून अधिक गावात त्यांचे पत्री सरकार होते. तेथे ब्रिटीश सरकारचा कोणताही आदेश न पाळता गावांचा स्वतंत्र कारभार चालायचा. क्रांतीसिंह नाना पाटील यांचे वक्तृत्व चांगले होते. त्यांना गावकऱ्यांना ब्रिटीशांविरोधात लढण्यासाठी तयार केले. प्रति सरकारच्या माध्यमातून त्यांनी दरोडेखोर, सर्वसामान्यांना छळणारे सावकार, जुलुमी ब्रिटीश अधिकारी आणि गावगुंड यांचा बंदोबस्त करण्यासाठी स्वत:चे 'तुफान सेना' नावाचे सैन्य दल निर्माण केले होते. सरकारी खजिना लुटणे, पोस्ट सेवांवर हल्ला करणे, रेल्वेवर हल्ला करणे अशा प्रकारे त्यांनी ब्रिटीश सरकारला सळो की पळो करुन सोडले.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Jadhav, V. N. (2026).** भारतीय स्वातंत्र्य संग्रामात कापसे गणपती रामचंद्र आणि कापसे रुक्मिणी गणपती यांचे योगदान. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 841–848.*

**संशोधनाची उद्दीष्टे:**

- स्वातंत्र सैनिक गणपती रामचंद्र कापसे आणि रुक्मिणी गणपती कापसे यांचे स्वतंत्र संग्रामामधील योगदान सर्वांपर्यंत पोहचवण्यासाठी.

**गृहीतके**

- भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महत्वाची भूमिका पार पाडली.
- स्वातंत्र्य संग्रामात पुरुषांबरोबर स्त्रियांनी ही योगदान दिले आहे.

**संशोधन पद्धती**

स्वतंत्र सैनिक गणपती रामचंद्र कापसे यांच्या पत्नी श्रीमती रुक्मिणी गणपती कापसे यांची मुलाखत घेऊन माहिती मिळवली. तसेच Document साहाय्याने माहिती मिळवली. त्यांची नोंद कोणत्याही पुस्तकात किंवा गॅझेटिअर मध्ये उपलब्ध नाही, म्हणून मी त्यांचे स्वातंत्र्य संग्राम मधील योगदान सर्वांपर्यंत पोहोचावे म्हणुन त्यांची माहिती घेतली आहे.

**प्रस्तावना**

ब्रिटीशांच्या जुलुमाने त्रस्त झालेल्या जनतेला महात्मा गांधी यांच्या रुपाने मोठा आधार मिळाला होता. भारतातील जनता महात्मा गांधी यांच्या एका आदेशाने आंदोलनात सहभागी होत होती. साल 1930 रोजी गांधीजीने सविनय कायदेभंग चळवळ सुरु केली होती. साताऱ्यातील येडे मच्छींद्रगड या गावाचे नाना पाटील ब्रिटीश सरकाराच्या काळात तलाठी म्हणून नोकरी करीत होते. त्यांना समाजकार्याची आवड होती. देश गांधीजींच्या नेतृत्वाने भारावलेला होता. त्यांनी तलाठी पदाचा राजीनामा दिला आणि स्वतंत्र लढ्यात सहभागी झाले. त्यांच्यावर सत्यशोधक समाज, महात्मा ज्योतिबा फुले आणि राजर्षी शाहु महाराज यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी महात्मा गांधी यांच्या आदेशानुसार सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला त्यानंतर ब्रिटीश राजवट झुगारुन त्यांनी नीरा नदीकाठापासून, वारणा नद्यांच्या खोऱ्यात 9 ऑगस्ट 1942 रोजी क्रांतीसिंह नाना पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत प्रति सरकार म्हणजेच पत्री सरकार स्थापन केले. 'पत्री सरकार' जुलुम करणाऱ्यांच्या पायात पत्रे ठोकते अशीही अफवा त्याकाळी पसरली होती. काय होते पत्री सरकार आणि त्यांनी ब्रिटीशांचे जगणे कसे हराम केले. अडीचशेहून अधिक गावात त्यांचे पत्री सरकार होते. तेथे ब्रिटीश सरकारचा कोणताही आदेश न पाळता गावांचा स्वतंत्र कारभार चालायचा. क्रांतीसिंह नाना पाटील यांचे वक्तृत्व चांगले होते. त्यांना गावकऱ्यांना ब्रिटीशांविरोधात लढण्यासाठी तयार केले. प्रति सरकारच्या माध्यमातून त्यांनी दरोडेखोर, सर्वसामान्यांना छळणारे सावकार, जुलुमी ब्रिटीश अधिकारी आणि गावगुंड यांचा बंदोबस्त करण्यासाठी स्वत:चे 'तुफान सेना' नावाचे सैन्य दल निर्माण केले होते. सरकारी खजिना लुटणे, पोस्ट सेवांवर हल्ला करणे, रेल्वेवर हल्ला करणे अशा प्रकारे त्यांनी ब्रिटीश सरकारला सळो की पळो करुन सोडले.

क्रांतीसिंह यांच्या पत्री सरकारमध्ये सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी न्यायालय, अन्नधान्य पुरवठा साखळी, गुंडांना शिक्षा करण्यासाठी खास व्यवस्था अशी सरकारची सर्व यंत्रणा या गावात उभी केली होती. त्यांच्या सोबत त्यावेळी नागनाथ नायकवडी ( अण्णा), जी.डी. लाड ( बापू ), नेताजी लाड आणि किसन अहिर ( शहीद झाले ) असे साथीदार होते. पत्री सरकारला निधी हवा होता. तेव्हा क्रांती सिंह नाना पाटील यांच्या तुफान सेनेने सातारा जिल्ह्यात 7 जून 1943 रोजी शेनोली गावात ब्रिटीशांची स्पेशल पे ट्रेन लुटली होती. 10 ऑक्टोबर 1943 रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील संगाव पोलिस ठाण्यात धावा बोलून रायफली पळविल्या होत्या. 14 एप्रिल 1944 रोजी धुळे जिल्ह्यातील चिमटाणा गावात महामार्गावर दरोडा टाकून ब्रिटीश खजाना लुटला होता.

क्रांतीसिंह यांना पकडण्यासाठी ब्रिटीशांनी अनेक इनामे घोषित केली होती. परंतू शेवटपर्यंत ते ब्रिटीशांच्या काही हाती लागले नाहीत. ते भूमिगत राहून आपले काम करीत राहीले आणि ब्रिटीशांविरोधात जनतेला एकत्र करीत राहीले. त्यांची धिप्पाड शरीरयष्टी आणि धारदार आवाजामुळे त्यांच्याकडे तरुणांचा ओढा राहीला. आणि गावेच्या गावे त्यांच्या पत्री सरकारमध्ये सामील होत

राहीली. नाना पाटील यांची कन्या हौसाबाई पाटील यांनी देखील सांगली जिल्ह्यातील पोलिस स्टेशनमधील दारुगोळा लुटण्यात पुढाकार घेतला होता. कधी ते टेलिफोनच्या वायर तोडत, कधी रेल्वे लुटत, तर कधी पोस्ट ऑफीस जाळत अशा प्रकारे त्यांचा ब्रिटीश सरकारला विरोध सुरुच होता.

1942 ते 1946 पर्यंत क्रांती सिंह नाना पाटील भूमिगत राहीले होते. सरकारने त्यांच्या जमीनी घरे जप्ती आणली. त्यांच्या आईच्या अंत्यसंस्काराला देखील ते उपस्थित राहीले पण ब्रिटीशांच्या काही हाती लागले नाहीत. ज्यावेळी स्वातंत्र्य मिळणार याची खात्री झाली त्याच वेळी 1946 मध्ये ते सातारा येथे प्रकट झाले. त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही भाग घेतला. शेकाप आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षात ते स्वातंत्र्यानंतर सक्रीय राहीले. स्वांतत्र्य लढ्याच्या इतिहासात त्यांचे नाव अजरामर झाले. त्यांचा 6 डिसेंबर 1976 रोजी वाळवा येथे मृत्यू झाला.

**भारतीय स्वातंत्र्य संग्रामात कापसे गणपती रामचंद्र आणि कापसे रुक्मिणी गणपती यांचे योगदान**

इ.स. १९४२ च्या चळवळीच्या प्रारभानंतर देशात ठिकठिकाणी शासकीय यंत्रणा मोडून पडल्यावर स्थानिक लोकांनी प्रतीसरकारे स्थापन करून प्रशासनाचे कार्य आपल्या हाती घेतले. इंग्रज सरकारच्या नियंत्रणाखाली असलेल्या विशिष्ट प्रदेशात भारतीयांनी स्वतःची शासनयंत्रणा निर्माण केली. त्यात प्रामुख्याने बंगालमध्ये मिदनापूर, बिहारमध्ये भागलपूर, ओरिसात बालासुर , आंध्रमध्ये भिमावरम येथे स्थापन झालेल्या प्रतीसरकारांचा उल्लेख करावा लागेल. ही प्रतिसरकारे फार काळ टिकू शकली नाहीत. महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यात क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेले प्रतिसरकार विशेष गाजले. हे प्रतिसरकार दीर्घकाळ अस्तित्वात होते व इंग्रजी सत्तेला शेवटपर्यंत दाद न देणारे हे एकमेव प्रतिसरकार होते. साताऱ्याच्या या प्रतीसरकारांचा प्रारंभ मोर्चे व निदर्शकांनी झाला. सरकारने लाठीमार व गोळीबाराचा अवलंब करताच चळवळीने उग्र स्वरूप धारण केले. कार्यकर्त्यांनी भूमिगत होऊन व वेगवेगळया गटांचे आयोजन करून शासकीय खजिन्यावर व शस्त्रागारांवर शिस्तबद्ध पद्धतीने हल्ले करण्यास सुरुवात केली. क्रांतीसिंह नाना पाटील हे या गनिमी युद्धाचे मूळ सूत्रधार होते. ब्रिटिशाबरोबरच्या दीर्घकालीन युद्धाची त्यांनी पद्धतशीरपणे तयारी केली. तुरुंगातून निसटून आलेले किसन वीर व वसंतदादा पाटील या गटात सामील झाले . काही काळातच यशवंतराव चव्हाणही या गटाला येऊन मिळाले . सातारा येथे स्थापन झालेले प्रतिसरकार ‘ प्रत्रीसरकार’ म्हणूनही ओळखले जात होते. नाना पाटील आणि त्यांचे सहकारी जुलमी सावकार , अधिकारी आणि फितुरांना दोन्ही पाय बांधून टाचेवर काठीचे तडाखे मारण्याची कठोर शिक्षा देत असत. या शिक्षेला सामान्य लोक ‘पत्री मारणे’ म्हणत . त्यावरून या सरकारलाही ‘ पत्रीसरकार ‘ म्हणून ओळखले जाऊ लागले. स्वातंत्र्य लढ्यात पुरुषांसमवेत महिलांनीही भाग घेतला होता. त्यात लोणंद येथील रुक्मिणी गणपती कापसे यांचे योगदान मोठे आहे. फक्त पुरुष नाही तर महिला सुद्धा स्वातंत्र्य संग्रामात सक्रिय होत्या, पण त्यांचा उल्लेख क्वचित आढळतो. अशाच एका धाडसी महिला स्वातंत्र्यसैनिक रुक्मिणी गणपती कापसे होत्या. त्यांचा जन्म 10 मार्च 1931 रोजी रुक्मिणी यांनी अल्पवयातच स्वातंत्र्य संग्रामात सहभाग घेतला.

स्वातंत्र्य सैनिक गणपती रामचंद्र कापसे यांचा जन्म सन 1919 रोजी झाला. त्यांच्या वडीलांचे नाव रामचंद्र शहाजी कापसे आहे. त्यांचे शिक्षण 12 वी झाले. गणपती कापसे यांचा विवाह रुक्मिनी कापसे या 9 वर्षाच्या होत्या तेव्हा झाला. त्यांना 5 मुले आहेत. गणपती कापसे यांचे मामा पांडुरंग बोराटे पांडुरंग बोराटे कुमठे गावचे होते. यांच्या प्रेरणेने तसेच मित्रांच्या सोबत ते 1939 ते 1947 च्या स्वातंत्र संग्रामात ते सामील झाले.

पाडुरंग बोराटे यांना पत्रीसरकार तसेच त्यांना तात्या म्हणूनही ओळखले जात. या संग्रामामध्ये तुषार पवार, नाना पाटील , किसण वीर, दादा सापोलकर यांच्याशी संपर्क आला. गणपती कापसे हे रात्रीचे बंड करत. ब्रिटिशांचे राज्य खालसा करायचे म्हणून ते नुकसान करायचे. बँक जाळने, पोस्ट जाळने, बँकेत दरोडा घालने, माणसांची गाडी जाऊ द्यायची मात्र ब्रिटिशांच्या मालगाड्या आल्या की रेल्वेच्या रुळ उकडायचे रुळाचे नटगोल्ट काढत आणि मालगाड्या ते पाडायचे कारण ब्रिटिशांचे राज्य होते ते त्यांना नको होते. त्यांना आपला देश स्वतंत्र करायचा होता. या उद्देशाने ते कार्य करायचे या स्वातंत्र संग्रामात त्यांची पत्नी रुक्मिणी कापसे यांचाही सहभाग होता. गणपती कापसे आपल्या देशाची ब्रिटिशांच्या तावडीतून सुटका व्हावी. आपले राज्य आपल्याला मिळावे. यासाठी ते स्वातंत्र संग्रामात स्वातंत्र्य संग्रामामध्ये सामिल होण्यापुर्वी ते सैन्यात मध्ये त्यांनी 3 वर्ष काम केले. ते सुट्टी संपवून परत जातताना त्यांचे मामा पांडरंग बोराटे यांनी अडवले, की जाऊ नकोस आपला देश आपल्याला स्वतंत्र करायचा आहे. सैन्यातील

नोकरी सोड आणि आमच्या सोबत चल त्यांनी त्यांचे ऐकले आणि स्वातंत्र संग्रामात सामील झाले. गणपती कापसे हे त्यांच्या मामांसोबत स्वातंत्र्य संग्रामात सामील झाले आणि ते भूमिगत झाले.

रुक्मिणी कापसे यांना पांडुरंग बोराटे यांनी भूमिगत असणाऱ्या लोकांना जेवण देण्याची जबाबदारी दिली होती. त्यांना सुरुवातीला भाकरी येत नव्हती तर त्यांचे मावस सासरे पांडुरंग बोराटे यांनी त्यांना कधी वेळ मिळेल तेव्हा त्यांना भाकरी शिकवल्या तसेच त्यांच्या सासूलाही शिकवण्यास सांगितले. रुक्मिणी कापसे या स्वत: चौथीमध्ये शिक्षण घेत होत्या. त्या दिवसभर शाळेत जायच्या आणि रात्रीच्या त्या भूमिगत लोकांना जेवण द्यायच्या. यस्कराच्या रुपाने पाडुरंग तात्या यांनी आपल्या एका व्यक्तीला पाठवले. त्याच्याकडे काखेत भाकरीच टोपल आणि त्यात भाकरी अशा वेशात एक माणूस पाठवला. त्याच्याकडे एक चिठ्ठी होती त्यात असे लिहिले होते की एवढ्या एवढ्या माणसाचे जेवण बनवायला सांगा. रुक्मिणी कापसे आणि त्यांची सासू त्यांना मदत करत. कधी कधी त्या एकट्या भाकऱ्या करत. कधी 22 माणसे तर कधी 24, तर कधी 20 असे माणसे असत. टोपल्यात भाकरी आणि कासंडीत (चरवित) आमटी किंवा पिठल भरुन द्यायचा तो माणूस जेवण होऊन जात आणि कुठे राणात वनात जिथे जागा मिळेल तेथे सर्व जेवायचे असे जवळपास 6 महिने चालू होते.

एक दिवस तो माणूस जेवण घेऊन गेल्यावर ब्रिटिशांचा छापा त्यांच्या घरावर पडला. ब्रिटिशांची गाडी भरून आली आणि एकदम काठी आपटत आपटत घरात घुसल्यानंतर रुक्मिणी कापसे या घाबरल्या पण त्यांना तात्यांनी याबद्दल. अगोदरच सुचना दिली होती. बघ असे कोणीतरी घरात येईल. तुला जाब विचारतील त्यांनी जरी बंदूकीचा ढाक दाखवला तरी आपला माणूस कुठे आहे हे सांगायचे नाही. जरी त्यांनी तुला काही केले तरी तु देशासाठी मेली असा तुझा उद्धार करू असे त्यांनी सांगितले होते. हे त्यांना आठवले आणि त्यांचा शरीरात उर्जा चढली तसेच त्या या प्रसंगाला धिटपणे सामोरे गेल्या. ब्रिटिशांचा तपास चालू झाला येथे कोण राहत त्या म्हणाल्या की तुम्हाला दिसतय ना कोण राहत ते. चुल आता का पेटवलीस असे ते हिंदीत बोलत होत ते त्यांना समजत होते मात्र त्यांना हिंदी बोलता येत नव्हते. चुल कशाला पेटवली तर त्या म्हणाल्या भाकरीला, तर ब्रिटिश म्हणाले यावेळी भाकरी का केली? त्या म्हणाल्या की माझे दिर लहान लहान आहेत ते अभ्यास करून ते झोपून गेले म्हणून मी त्यांच्यासाठी गरम गरम भाकरी केली कारण त्याना थंड भाकरी आवडत नाही. तर ब्रिटिश म्हणाले, खोट खोट सांगते. त्या म्हणाल्या खोट सांगण्याची काय गरज आहे. कोण आल होत ते सांग भाकऱ्या कोणाला दिल्या ते सांग त्या म्हणाल्या कि मी आहे तेच सांगणार तुम्हाला ब्रिटिशांचे तेवढ्यावर त्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी रुक्मिणी कापसे यांच्या दोन वेण्या धरून तीन वेळा भिंतीवर आपटले. तु खर सांगत नाही म्हणून त्या म्हणाल्या की तुम्ही मारा मला. तुम्ही मला काहीही केले तरी मी आहे तेच सांगणार याच्या पलिकडे तुम्हाला काही करायचे असेल ते करा. यानंतर ब्रिटिश तिथून नाईलाजाने निघून गेले.

**स्वातंत्र्यसैनिक कापसे गणपती रामचंद्र स्वातंत्र्यसैनिक कापसे रुक्मिणी गणपती**





## शाळा सोडल्याबद्दल दाखला


**Leaving Certificate.**
(Prescribed by Rule 11, Chapter I, of the Grant-in-aid Code.)
*English Class attached to Local Board Primary School No. 1, Koregaon Dist. Satara.*
Register No. of the Pupil : 231
Name of Pupil in full :— Mali Ganapati Ra...
Race & caste (with sub-caste) :— Hindoo - Mali
Place of Birth :— Koregaon
Date of birth, month & year :— (according to Christian era). 26-6-1918 Twenty six, Six, Eighteen
Last school attended :— L. B. School Koregaon
Date of admission :— 10-6-31
Progress :— Poor
Conduct :— Good
Date of leaving school :— 21-4-34
Standard in which studying & since when :— Std III, appeared for V. F
Reason of leaving school :— appeared for V. F.
Remarks :— This English Class is permanently registered as per D. P. I's No. S/67 – (c) – 79 – c of 9-3-1927.
Certified that the above information is in accordance with the School Register.
Dated 1-5-1950
English Class Teacher, Koregaon, Dist. Satara.
Head Master, L. B. Primary School No. 1. Koregaon, Dist. Satara.


HUTATMA P. P. SANGLI, 50,000—63
शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सांगली
लीव्हिंग सर्टिफिकेट नमुना नं. १७
**शाळा सोडल्याबद्दलचा दाखला**
( ग्रांट-इन-एड कोडाच्या १७ व्या नियमाप्रमाणें )
शाळेचे नांव—
विद्यार्थ्याचा रजिस्टर नंबर—
१ विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव— ... गणपती कापसे
२ धर्म आणि जात ( पोटभेद )— हिंदू माळी
३ जन्मस्थळ, तालुका व जिल्हा—
४ ख्रिस्ति सनाप्रमाणें जन्म-तारीख, महिना आणि सन— ( अक्षरीं व अंकीं )
५ या शाळेत येण्यापूर्वी विद्यार्थी शिकत असलेली शाळा—
६ शाळेत प्रविष्ट झाल्याची तारीख—
७ अभ्यासांतील प्रगति—
८ शाळेतील वर्तणूक — चांगली
९ शाळा सोडल्याची तारीख–माहे व सन
१० कोणते इयत्तेत व कधीपासून शिकत होता— ( अक्षरीं व अंकीं )
११ शाळा सोडल्याचे कारण—
१२ शेरा—
दाखला देण्यांत येतो की, वरील माहिती शाळेतील रजिस्टर नं. १ प्रमाणें आहे.
तारीख २९ माहे ८ सन १९६४
सही
वर्ग शिक्षक
हेडमास्तर
टीपः-१) शाळा सोडण्याचें वेळीं देण्यांत येणाऱ्या लीव्हिंग सर्टिफिकेटमध्यें करावयाची कोणतीहि दुरुस्ती त्यांबद्दल शाईनें हेडमास्तरांनी संक्षिप्त सहीनिशी करावी.
२) लीव्हिंग सर्टिफिकेटमध्यें अनाधिकृतरीत्या बदल केल्यास त्या विद्यार्थ्याचें नांव कमी करण्यांत येईल.


सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**सन्मान पत्र**
श्री. कै. गणपत रामा कापसे भूमिगत स्वातंत्र्य सैनिक यांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामांत केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ हे सन्मानपत्र देण्यात येत आहे.
वसंत नाईक
मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य
सचिवालय,
मुंबई
दिनांक


स्वातंत्र्य संग्राम सैनिक सहाय्यक मंडळ
जिल्हा – सातारा.
**-: सन्मानपत्र :-**
श्री. गणपत रामा कापसे
गांव कोरेगांव तालुका कोरेगांव यांस
महोदय,
आपण भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात केलेल्या महान कामगिरीच्या गौरवार्थ आपणास हे सन्मानपत्र देण्यात येत आहे.
अध्यक्ष
स्वातंत्र्य संग्राम सैनिक सहाय्यक मंडळ,
जिल्हा – सातारा.
दिनांक १५-८-१९७३

**सन्मानपत्र**



सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

मानपत्र

श्री./श्रीमती रुक्मिणी गणपती कापसे यांना

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात दिलेल्या योगदानाप्रित्यर्थ स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने हे मानपत्र देण्यात येत आहे.

दिनांक : ३०/०८/२०२३

(जितेंद्र डूडी) भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, सातारा

(शंभूराज देसाई)
पालकमंत्री, सातारा



"विविध क्षेत्रात राष्ट्रसेवा केलेल्या व्यक्तींना/
त्यांच्या कुटुंबियांना मदत देण्यासाठी
स्वेच्छाधीन निधीतून आर्थिक सहाय्य...

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:पीओजेत १२९०/भूमिगत/१/सातारा/स्वातंत्र्य,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ७ मे, १९९०.

शासन निर्णय:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. पीओजेत/१०६५/ल, दिनांक १९ नोव्हेंबर १९६५ ला जोडलेल्या नियमावलीतील नियम ३(अ)३(ब) व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. पीओजेत १२८६/(३)/स्वातंत्र्य, दि. ७. ८. ८६ ला अनुसरून विविध क्षेत्रात राष्ट्रसेवा केलेल्या व्यक्तींना/त्यांच्या कुटुंबियांना मदत देण्यासाठी असलेल्या स्वेच्छाधीन निधीतून श्रीमती रुक्मिणी गणपत कापसे, मु. पो. ता. कोरेगाव, जि. सातारा, द्वारा: पांडुरंग कोंडीबा बोराटे, मु. पो. कुमठे, ता. कोरेगांव, जि. सातारा यांना दिनांक २५ जानेवारी ८९ पासून रु. ३७५/-(रु. तीनशे पंच्याहत्तर फक्त) प्रमाणे तहहयात पेन्शन मंजूर करीत आहे. ह्याबरोबर असेही प्रमाणित करण्यात येत आहे की, वरील नियमावलीतील नियम ५ मधील तरतूदी पूर्ण झालेल्या आहेत. या प्रकरणी यापूर्वी पेन्शन मंजूर झालेली नाही, याबाबत खात्री करून नंतरच पेन्शनची रक्कम अदा करावी.

२. हा खर्च, "२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण [१०२][१] स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्ती इत्यादींना निवृत्तीवेतन [मागणी क्र. ए १४] सांकेतांक क्र. २२३५००१५" या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

द. दे. साठे

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
अध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई (मुख्यमंत्री यांचे सचिवालय),
सभापती, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
राज्यमंत्री, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
महालेखाकार, महाराष्ट्र १ [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई [२ प्रती],
महालेखाकार, महाराष्ट्र २ [लेखा व अनुज्ञेयता], नागपूर [२ प्रती],
जिल्हाधिकारी सातारा/जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग, का. क्र. ३५/निवड फाईल/संबंधित सहाय्यक [अंदाजपत्रक],
श्रीमती रुक्मिणी गणपत कापसे, मु. पो. ता. कोरेगाव, जि. सातारा, द्वारा: पांडुरंग कोंडीबा बोराटे, मु. पो. कुमठे, ता. कोरेगांव, जि. सातारा.

----x----

द. ७५९०.

**स्मृती चिन्ह**





**स्वातंत्र्य सैनिकाचे ओळख पत्र**



ओळखपत्र क्रमांक ... दिनांक ...
स्वातंत्र्य सैनिकाचे वा विधवेचे नाव ...
स्वातंत्र्य सैनिकाचा पत्ता ...
केंद्र शासन/राज्य शासन पेन्शनधारक
जिल्हाधिकाऱ्याची सही/शिक्का
स्वातंत्र्य सैनिकाची सही/अंगठा
सूचना : (१) स्वातंत्र्य सैनिकाने ओळखपत्र जपून वापरावे.
(२) ओळखपत्र हरविल्यास स्वातंत्र्य सैनिकाने जिल्हाधिकाऱ्यांना तत्काळ कळवावे.
(३) ज्या व्यक्तीस हे ओळखपत्र सापडेल त्याने ते स्वातंत्र्य सैनिकास अथवा संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना परत करावे.

महाराष्ट्र शासन
★
स्वातंत्र्य सैनिकाचे
ओळखपत्र

**स्वातंत्र्यसैनिक कापसे रुक्मिणी गणपती यांच्या सोबत**



**समारोप**

गणपती कापसे हे बिटिशांना कधीही सापडले नाहीत ते नेहमी लपून असायचे. प्रतिसरकार मध्ये असताना त्यांना गोळी लागली होती. गोळी काढली ते बरे सुध्दा झाले. त्यानंतर त्यांचे लग्न झाले. त्यांना मुले झाली ती मोठीही झाली. त्या गोळीचा काही अंश त्यांच्या पोटात जठरात राहिल्यामुळे त्यांना कॅन्सर झाला. या कॅन्सरमुळे त्यांचा मृत्यू झाला. आता त्यांची पत्नी श्रीमती कापसे रुक्मिणी गणपती या 94 वर्षाच्या आहेत. त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोलाचे योगदान दिले.

**संदर्भ साधन**


- प्रत्यक्ष मुलाखत
- शाळा सोडल्याचा दाखला
- स्वातंत्र्य सैनिकाचे ओळख पत्र
- सन्मानपत्र
- स्मृती चिन्ह